# वर्तमान परिप्रेक्ष्यात नीती आयोगाच्या कार्याचे अवलोकन

**डॉ. विठ्ठल घिनमिने**
सहाय्यक प्राध्यापक (अर्थशास्त्र)
श्री. साईबाबा लोक प्रबोधन कला महाविद्यालय
वडनेर ता. हिंगणघाट जि. वर्धा
९६८९६४२४४९
vghinmine1980@gmail.com

**गोषवारा :–**

भारताच्या स्वातंत्र्यानंतर नियोजन आयोगाने भारताच्या सर्वांगिण विकासामध्ये महत्वपूर्ण भूमिका पार पाडली आहे. परंतु गेल्या ६५ वर्षामध्ये भारतात सर्व स्तरावर अनेक परिवर्तनकारी बदल झाले त्यामुळे या बदलत्या परिस्थितीनुसार निती आयोगाची स्थापना करण्यात आलेली आहे. यामध्ये लोकसंख्येत झपाटयाने झालेली वाढ, आर्थिक परिवर्तन, खाजगी क्षेत्राचे विस्तारीकरण, जागतीकीकरणाची प्रक्रिया, विकास प्रक्रियेत राज्याची भूमिका, औद्योगिक क्षेत्रात झालेली प्रगती, केंद्र आणि राज्याचा विकासात्मक नवीन गरजा या सर्व बदलामुळे निती आरोग्याची स्थापना करण्यात आली. सरकार निती आयोगा आकांशापुर्ती करणारी वास्तविक संस्था बनविणार असून या आयोगाची स्थापना विभिन्न हितधारक समुह, राज्य सरकारे, प्रासंगिक संस्था, विषयतज्ञ आणि सामान्य लोकांबरोबर व्यापक विचार –विनिमय करून करण्यात आली आहे.

Key words – उर्ध्व मॉडल, संग्राहक, प्रसारक, अनुश्रवण, मूल्यांकन, समावेशन, संघवाद

**प्रस्तावना :–**

भारतामध्ये २६ मे २०१४ पासून माननीय श्री. नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वात एक मजबूत आणि स्थिर सरकार अस्तित्वात आले आहे. या नवीन सरकारमध्ये अनेक क्षेत्रामध्ये नवीन उर्जा आणि उत्साहाचे वातावरण निर्माण झाले. देशाच्या सर्वांगीन विकास करण्याच्या उद्देशाने संघीय ढाच्याला पुनर्परिभाषित करून राज्याना अधिक सक्षमकरण्यात येवून त्यांना या विकासाच्या प्रक्रियेत पुढे करणे आणि राज्याच्या आर्थिक परिघ वाढविण्यावर भर देण्याचे ठरविण्यात आले. या धोरणाअंतर्गत भारत सरकारने ६५ वर्षापासून चालू असलेल्या नियोजन आयोगाला भंग करून त्यांच्या जागेवर निती आयोगाची स्थापना जानेवारी २०१५ मध्ये करण्यात आली. निती (NITI) या शब्दाचा अर्थ आहे 'National Institute for Trasforming India' सरकार या नवीन संस्थेमध्ये टीम इंडीयाच्या उदय आणि विकासाच्या दृष्टीने वाटचाल करण्याच्या प्रयत्नात आहे.

भारत सरकार नीती आयोगाच्या मदतीने भारताच्या विकास एजेंडाला रूपांतरीत करून विकासाच्या प्रक्रियेत राज्याच्या भूमिकेला महत्वपूर्ण स्थान देण्यात येईल. भारतात मागील सहा दशकांमध्ये राजकीय, आर्थिक, सामाजिक, औदयोगिक आणि लोक सांख्यिकीच्या स्वरूपात विविध नीतीगत परिवर्तन झाले आहे. सरकारची भूमिका पण राष्ट्रीय विकासासाठी त्याप्रकारे समानंतर रूपाने विकसित करण्याची राहिलेली आहे. हा नीती आयोग धोरण ठरविण्याबाबतचे एक विचार संघटन आहे. हा आयोग राज्य सरकारला युक्तिगत व तांत्रिक सल्ला देत राहील याशिवाय नीती निर्णयामध्ये एक भागीदार ही राहतील म्हणजेच स्थानिय संस्था व

राज्ये सरकारे यांना महत्वाची भूमिका निभवायची असून गेल्या ६० वर्षापासून चालू असलेल्या जुन्या योजना आयोगाचे औचित्य संपुष्टात आलेले आहे.

**नीती आयोगाची आवश्यकता :**

- **लोकसांख्यिकीय परिवर्तन :—**

भारताची लोकसंख्या तिप्पट वाढून १३० कोटीपर्यंत पोचली आहे. याच्या अंतर्गत शहरी लोकसंख्येत संलग्न ३० कोटीची लोकसंख्या पण सामील आहे. त्याचबरोबर ३५ वर्षपेक्षा कमी वयाचे ५५ कोटी युवा लोकसंख्येचा हिस्सा बनले आहेत. विकास, साक्षरता आणि संचाराच्या वाढत्या स्तराबरोबर लोकांच्या आकांक्षा अभाव व अस्तित्वाच्या स्तरापेक्षा पुढे जावून सुरक्षा व अधिशेषापर्यंत जाऊन पोहचला आहे. आजचा भारत एकदम बदललेला भारत आहे. आणि भारताच्या शासन व्यवस्थेला या बदललेल्या भारताच्या आवश्यकतांच्या अनुरूप बदलायचे आहे.

- **आर्थिक परिवर्तन :—**

भारताच्या अर्थव्यवस्थेत विभिन्न स्वरूपाचे बदल घडून आले आहे. तिचा शंभर पट विस्तार झाला आहे. वर्तमान मूल्यांवर सकल घरगुती उत्पादन १ हजार कोटी रूपयांपासून सुरू होवून शंभर लाख कोटी रूपयांपर्यंत पोहचले आहे. अशा प्रकारे आज ही जगाच्या सर्वात मोठया अर्थव्यवस्थांमधील एक आहेत. भारताच्या जी.डी.पी. मध्ये कृषीच्या हिश्श्यात भरपूर घट आली आहे. ५० टक्यापासून घटून १५ टक्के. पर्यंत घटलेला आहे.पहिल्या योजनेच्या २४०० कोटी रूपयाच्या योजना आकार वाढून आज १२ व्या योजनेच्या आकार ४३ लाख कोटी रूपयाचा झाला आहे. प्राथमिकता, रननिती आणि संरचना ज्या नियोजन आयोगाच्या जन्मापासून चालत आला आहेत. त्या आता बदलायला पाहिजेत या व्यापक परिवर्तनाच्या यतार्थदर्शनात भारतात योजना प्रक्रियेच्या प्रकृतीलाच बदलण्याची आवश्यकता आहे, असे सरकार मानते.

- **परिवर्तित खाजगी क्षेत्र :—**

भारतीय अर्थ व्यवस्थेची प्रकृती आणि त्यात सरकारची भूमिका यात भरपूर बदल आला आहे. सतत मुक्त आणि उदारीकृत होणाऱ्या अर्थ व्यवस्थेत खाजगी क्षेत्राची आज एक अत्यंत जिवंत आणि गतीशिल भूमिका आहे. खाजगी क्षेत्र केवळ आंतराष्ट्रीय व्यापाराच्या बळावरच नाही. तर जागतिक मानदंड आणि पोहोचबरोबर आपली सार्थक भूमिका निभावत आहे. हे बदललेले आर्थिक वातावरण प्रशासनिक बदलाची जी मागणी करते त्यात सरकारची भूमिका आदेश आणि नियंत्रण परिस्थितीक व्यवस्थेत संसाधनांच्या वाटपापेक्षा पुढे असून बाजार परिस्थितिकी व्यवस्थेला निवेशित, समर्थित आणि नियमित करण्याची असायला पाहिजे, राष्ट्रीय विकासाला आता सार्वजनिक क्षेत्राच्या पलीकडे बघण्याची गरज आहे. सरकारने 'पहिले प्रदायक आणि अंतिम आश्रम' आणि अर्थव्यवस्थेच्या 'मोठया खेळाडू' च्या आपल्या भूमिकेत बदल करून एका 'सामर्थ्यकारी वातावरणात' चे पोषण करणाऱ्या 'उत्प्रेरका' च्या भूमिकेत यायला पाहिजे जिथे लहानात लहान उद्योगापासून मोठयात मोठया कंपनांची उदयोगशिलता शिखराला पोहचले यामुळे एक महत्वपूर्ण गोष्ट ही होईल की सरकार जन कल्याणाचे क्षेत्र जसे —खाद्य, पोषण, आरोग्य, शिक्षण आणि उपजीविका इत्यादीवर आपल्या बहूमूल्य संसाधनांना अधिक खर्च करू शकेल.

- **जागतिकीकरणाच्या शक्ती :—**

गेल्या दशकांमध्ये जग पण एका 'विश्वग्राम' च्या रूपात विकसित झाले आहे. विभिन्न देश आणि समाज आपआपसात आधुनिक दळणवळण, संचार, जन माध्यम आणि आंतरराष्ट्रीय बाजार व संस्थाच्या अंतजाळाच्या माध्यमातून जोडलेले आहे. अशा वातावरणात भारताच्या आर्थिक क्रिया जागतिक गतीशिलतेला वाढवतात त्याच बरोबर आपली अर्थ व्यवस्थापन दुरवी घडत असलेल्या घटनांपासून प्रभावित झाल्याशिवाय राहू शकत नाही. म्हणून सरकारने कामकाजाला जोडून आर्थिक नितीच्या रूपरेषेत जागतिक, आर्थिक व्यवस्थेशी आपल्या संलग्नतेच्या वास्तविकतांना सामिल करायला पाहिजे.

- **राज्यांची भूमिका :—**

भारतीय राज्यांच्या विकास केंद्राच्या उपांगांपासून सुरू होवून राष्ट्रीय विकासाच्या वास्तविक चालकाच्या रूपात झाला आहे. म्हणून राज्याचा विकास राष्ट्रीय ध्येय असायला पाहिजे कारण राज्याच्या विकासातच देशाची प्रगती आहे. याच कारणामुळे केंद्रीकृत नियोजनात सर्वाबाबत समान व्यवहार दृष्टीकोन स्वाभाविकपणे समाविष्ट राहतो. परंतु आता हे व्यावहारिक राहीले नाही. राज्यांना पण ऐकणे आवश्यक आहे आणि त्यांनाही कार्यान्वयनासाठी पुरेसा लवचीकपणा प्रदान केला गेला पाहिजे. डॉ. बी. आर. आंबेडकरांच्या शब्दात, ''जिथे केंद्रीय नियंत्रण आणि एकरूपता अनिवार्य नसेल किंवा अव्यवहार्य असेल. तिथे सत्येचे केंद्रीकरण अयोग्य आहे.''

अशाप्रकारे जिथे भारताच्या रननितीत जागतीक अनुभव अआणि रा ट्रीय सहक्रियेपासून उपजाव्या आणि विकसीत व्हाव्यात, तिथेच त्या स्थानिक गरजा आणि संधीच्या अनुरूप ढाळल्या जातील, हे बघावे लागेल.

- **औद्योगिकीय परिप्रेक्ष्य :—**

औद्योगिक प्रगती आणि सूचना प्रसाराने भारताच्या सृजनशील उर्जेसाठी दरवाजे उघडले आहे. यामुळे आपल्या वैविध्यपूर्ण क्षेत्रांना आणि परिस्थितीकी व्यवस्थांना एक राष्ट्रीय अर्थव्यवस्था आणि समाजात विन्यस्त केले आहे. आणि मुळे समन्वय आणि सहकाराचा मार्ग प्रशस्त झाला आहे. सरकारला अजून जबाबदार बनविण्यासाठी औद्योगिकचे भूमिका पारदर्शता आणण्यात आणि कार्यकुशलता वाढवण्यातही आहे. अशा प्रकारे हे आवश्यक आहे की औद्यौगिक तंत्रज्ञान भारताच्या निती आणि शासनाच्या व्यवस्थेत केंद्रस्थानी राहणे आवश्यक आहे..

**निती आयोगाची उद्दि टे:—**

नीती आयोगाची उद्दिष्टे खालील प्रमाणे आहेत.

१. नीती आयोगानुसार सरकारची भूमिका ही प्रथम व अंतिम प्रदाताची राहील.
२. शेतकऱ्यांना त्यांच्या उत्पादनावर मिळणाऱ्या वास्तविक प्रतिफलावर भर देण्यात येईल.
३. जागतिक स्तरावर असणाऱ्या स्पर्धेत प्राथमिक भूमिका निभावून देण्यास सामर्थ्यवान करणे.
४. भारतात उपलब्ध असलेल्या उद्यमक्षमतेचा तसेच बौद्धिक व वैज्ञानिक क्षमतेचा आणि कौशल्याचा उपयोग करून घेणे.
५. स्वस्थ व सुरक्षित निवास स्थानांच्या निर्मितीकरिता आधुनिक तंत्रविद्येचा उपयोग करून त्याद्वारे शहरीकरणाचा विकास करणे प्रोद्योगिकतेच्या साहयाने प्रशासन व अपारदर्शी कार्यांना आळा घालणे.

६. प्रौद्यौगिकतेच्या साहयाने प्रशासन व अपादर्शी कार्यांना आळा घालणे.
७. सक्षम असलेल्या मध्यमवर्गाला योग्यतेनुसार काम देणे.

**निती आयोगाची कार्य :—**

नीती आयोगाने आपल्या राष्ट्रीय धोरणे आणि कार्यक्रमात लवचीकपणा निर्माण करून पुढील कार्य निर्धारीत केली आहे.

**१. सहकारी आणि स्पर्धापूर्ण संघवाद :—**

हा सहकारी संघवादाच्या संचालनाचा प्राथमिक मंच असेल, ज्यात राज्यांना राष्ट्रीय धोरणे बनवण्यात सहभागी केले जाईल. त्याच बरोबर गुणात्मक आणि परिणात्मक ध्येयांच्या कालबद्ध कार्यान्वयनासाठी पंतप्रधान आणि मुख्यमंत्र्यांचा संयुक्त अधिकार शक्तीचा उपयोग केला जाईल. असे केंद्र आणि राज्य सरकार मध्ये व्यवस्थित आणि सुगठित अंत:क्रियांच्या माध्यमातून शक्य होईल, ज्या विकासाच्या मुद्याबांबत समज बनवून रणनिती आणि कार्यान्वयन प्रक्रियांना घेऊन सर्व सर्वसंमती प्राप्त करण्याचा प्रयत्न केला जाईल. अशा प्रकारे 'केंद्राकडून राज्याकडे' या एकतर्फी धोरणाच्या जागेवर सतत केंद्र राज्य सहभागाचे धोरण स्वीकारले जाईल. आयोग या सहयोगाला अशा प्रकारे वाढवण्यात मदत करेल की प्रतिस्पर्धी संघ वादाला प्रोत्साहन मिळेल. केद्र राज्यांन बरोबर आणि राज्य केद्राबरोबर स्पर्धा करेल, त्याच बरोबर राज्ये आपआपसातही स्पर्धा करेल, अशाप्रकारे देशाच्या विकासाचे क संयुक्त अभियान सुरू होईल.

**२. सहभागात्मक राष्ट्रीय एजेंडा:—**

यामुळे देशाच्या विकासाच्या प्राथमिकता आणि रननितींबाबत राज्याचा सक्रिय भागीदारी बरोबर एक सहभागात्मक, 'व्हिजन' विकसित होईल. यामुळे राष्ट्रीय एजेंडाची एक रूपरेषा बनेल ज्याचे कार्यान्वयन पंतप्रधान आणि मुख्यमंत्री करतील.

३. **केंद्र राज्यांचा खरा मित्र :—**

केंद्र राज्यांना त्यांच्या आपल्या आव्हांनांचा सामना करण्यात मदत करेल, जे अनेक माध्यमांपासून शक्य होईल. जसे मंत्रालयांबरोबर समन्वय करून, केंद्रात त्यांच्या विचारांना स्थापित करून आणि सल्ला सहयोग आणि क्षमता निर्माणाद्वारे केला जाईल.

**४. विकेंद्रित नियोजन :—**

नवीन संस्थेला नियोजन प्रक्रियेची पुनर्रचना करून याला 'सपाट—ऊर्ध्व मॉडल' च्या रूपात विकसित करायचे आहे. राज्यांना मजबूत बनवत त्यांना खालच्या स्थानिक सरकारांना सशक्त बनविण्यासाठी मार्गदर्शन करायचे आहे. ज्यामुळे ग्राम स्तरावर विश्वसनीय योजनांच्या सूत्रणाची एक प्रक्रिया विकसित केली जावू शकेल, ज्याच्या समावेश सरकारच्या उच्चतर स्तरांवर होवू शकेल.

भारतीय सरकारी संस्थांच्या परिपक्वतेबरोबर त्यांच्या प्रकार्यांमध्ये विशेषज्ञता येत गेली आहे. इथे हे यासाठी आवश्यक झाले आहे कारण गव्हर्नेसच्या 'रणनिती' तत्वाला 'प्रक्रिया' आणि'कार्यान्वयना' पासून वेगळे करून त्यावर अधिक ऊर्जा लावली जावी. सरकारच्या एका समर्पित 'थिंक टॅक' च्या रूपात निती आयोग ही 'निदेशन' भूमिका निभावेल, देशाच्या भविष्याचे निरूपन करेल हा देशाच्या विकास एजेंडासाठी महत्वपूर्ण असलेल्या अशा मुद्यांवर विशेषज्ञतापूर्ण चर्चा करणे, जसे— रणनिती, प्रकार्यात्मक आणि तांत्रिक

पंतप्रधान आणि सरकारला 'केंद्र आणि राज्य सरकार देईल.म्हणजे नवीन संस्था 'थिंक टॅंक' च्या रूपात कार्य करेल.

**५. दृष्टी आणि परिदृष्य नियोजन :–**

भारताच्या भविष्याच्या योजना, प्रक्षेत्र, क्षेत्र आणि काळाच्या पुढे सर्व संभाव्य वैकल्पिक धारणांना सामील करत मध्यम आणि दिर्घकालीन रननिती रूपरेषाच्या प्रकल्प तयार करणे हेच 'राष्ट्रीय सुधारणा एजेंडाचे चालक' आहे. हे महत्वपूर्ण फरकांची ओळख करून आतापर्यंत न वापरल्या गेलेल्या क्षमतांचा पूर्ण–पूर्ण उपयोग करतील. त्या आपली सफलता आणि उपादेयतेबाबत आंतरीक रूपाने संचेत आणि गतिशिल होती आणि असे वातावरण सृजित करावे लागेल ज्यात वर येत असलेल्या प्रवृत्तींचा समावेश केला जावू शकेल आणि नविन आव्हानांना उत्तर दिले जावू शकेल. याचा अर्थ एक मूलभूत बदल होईल. देशाचा पैसा कुठे जातो–याच्या नियोनापासून अशा नियोजनाकडे अंतरण ज्यात हे बघणे की आपण देशाला कुठे घेवून जावू इच्छितो या नवीन संस्थेची स्थिती भारत सरकार आणि राज्य सरकारांच्या समस्त विकास गतिविधींचे समेकन करण्याची आहे. म्हणून या उद्देशाच्या सर्वथा उपयुक्त आहे.

**६. क्षेत्र रणनिती :–**

प्रक्षेत्रीय आणि अंतरप्रक्षेत्रीय विशेषज्ञता आणि विशिष्टतेचे 'भंडार' निर्मीत करून केंद्रीय मंत्रालये आणि राज्य सरकारांचे विकास नियोजन आणि त्यांच्या समस्यांचे निवारण करण्यात सहायता प्रदान करणे एक महत्वपुर्ण कार्य आहे. यामुळे सुशासनाच्या प्रचलनांना 'राष्ट्रीय आणि आंतराष्ट्रीय स्तरावर', विशेष करून देशात व्यवस्थागत सुधारणा आणि बदलासाठी स्विकारण्यात मदत मिळेल.

**७. ध्वनी – बोर्ड :–**

आंतरिक ध्वनी–बोर्डच्या रूपात सरकारच्या स्थितीला वस्तुनिष्ठ टिका आणि व्यापक प्रती धारणांच्या माध्यमातून गठन आणि संस्कृत करणे.

**८. तज्ज्ञांचे नेटवर्क :–**

सरकारची धोरणे आणि कार्यक्रमांमध्ये बाहय विचारांना राष्ट्रीय आणि आंतराष्ट्रीय तज्ज्ञांचे का सहयोगी समुदाया माध्यमातून सामील करणे. या साठी सरकारच्या बाहय जगाशी संबंध आवश्यक आहे. खाजगी क्षेत्र विशेषज्ञता आणि व्यापक रूपात लोकांना निती निर्माणाच्या प्रक्रियेत संलग्न करणे आवश्यक असेल.

**९. ज्ञान आणि नवाचार केंद्र :–**

एका आधुनिक संसाधन केंद्राच्या माध्यमातून हे संस्था सुशासनावर शोध आणि सर्वोत्तम प्रचलनांच्या एक 'संग्राहक' आणि 'प्रसारक' बनावे, जे यांना चिन्हित करेल, विश्लेषण करेल आणि त्यांच्या प्रतिकृतीला शेअर करेल दस्तऐवजात पुढे लिहिले आहे.– उत्तरोत्तर प्रौढ होत असलेल्या भारतीय जनतेने आपले लक्ष वास्तविक वितरण आणि परिणामावर केंद्रित केले आहे. वाढत्या आकाक्षांना पूर्ण करण्यासाठी नवीन नियोजन आणि रणनिती निर्माणा पेक्षा पुढे जावू विकास एजेंडा लागू करण्याकडेही लक्ष द्यावे लागेल. यासाठी कार्यान्वयनाला वास्तविक परिणामांना, यथार्थ ध्येयांना, कालबध्दता, सक्षम अनुश्रवण आणि मुल्यांकनाच्या माध्यमातून नियोजन प्रक्रियेच्या केंद्रात आणावे लागेल अर्थात केवळ नियोजन अथवा

योजना– निर्माणच्या संकल्पनेपासून 'कार्यान्वयनासाठी नियोजन' याकडे जावे लागेल. हे सरकारी तंत्रासाठी उत्प्रेरकाचे जसे– अंतरांना कमी, क्षमता वाढवणे आणि अवरोधांना हटवण्याचे कार्यही करेल.

**१०.सुसंगतीकरण :–**

सरकारने विभिन्न स्तरांच्या प्रक्षेत्र, विशेष करून एक–दुसऱ्या प्रक्षेत्राला प्रमाणित करणारे मुद्दे सामील झाल्यावर संचार, समन्वय, सहयोग आणि समस्त हीतधारकांच्या अभिसरणाच्या माध्यमातून कार्यवाहीमध्ये सुसंगतता स्थापित करणे. विकासात एका समेकित आणि समग्र दृष्टिकोनवर सर्वांमध्ये सहमती बनावी.

**११.संघर्षाचे समाधान :–**

अंतर–प्रक्षेत्राय, अंतर–विभागीय, अंतर–राज्यीय आणि केंद्र–राज्यामध्ये परस्पर सहमतीचा एक मंच प्रदान करणे आणि सर्वांच्या हितात सर्व समतीचे निर्माण करणे. कार्यान्वयनाच्या स्तरावर स्पष्टता आणि तीव्रता आणणे.

१२.**जगाबरोबर आंतरपृष्ठीय समन्वय:–**

हा एक 'नोडल प्वाइंट' असेल की भारताच्या विकासासाठी जागतिक विषय तज्ज्ञ आणि संसाधानांचा रणनीतीक वापर केला जाईल.

**१३.आंतरिक सल्ला:–**

ही संस्था नीती आणि कार्यक्रमाला डिझाईन करण्यात केंद्र आणि राज्यांना आंतरीक सल्ला प्रदान करेल ज्यात विकेंद्रिकरण, लवचीकपणा आणि परिणामोन्मुखतेवर विशेष भर असेल. यात सार्वजनिक –खाजगी भागीदारीची रचना आणि कार्यान्वयन संबंधी विशेष कुशलता पण सामील असेल.

**१४.क्षमता निर्माण :–**

सरकारमध्ये समता निर्माण आणि औद्योगिक स्तर उन्नयनासाठी तयारीवर जोर दिला जाईल, जी अद्ययावत जागतिक प्रवृत्ती आणि तांत्रिक माहितीवर आधारित असेल.

**१५.अनुश्रवण आणि मूल्यांकन :–**

हा निती आणि कार्यक्रमाचे अनुश्रवण आणि मुल्यांकण करेल, त्याच बरोबर त्यांच्या प्रभावाचे मुल्यांकणही कार्य– प्रदर्शन मॅट्रीक्स आणि व्यापक कार्यक्रम मुल्यांकणाच्या आधारावर करेल हा केवळ उणीवा आणि अवरोधांना चिन्हित करून त्याचे निदान करणार नाहीत, तर आकडे –संचालित नीती–निर्माणच्या माध्यमातून अधिक कार्यकुशलता आणि प्रभाव कारितेला प्रोत्साहित करेल.

**निष्कर्ष:–**

नीती आयोगाच्या संपुर्ण कार्याचे अवलोकन केल्यास असे दिसून येते की आयोगाला खालील क्षेत्रावर भर देवून कार्य करायचे आहे.

१. कृषी :–

शेतकऱ्याचे उत्पन्न वर्ष २०२२ पर्यंत दुप्पट करणे. यासाठी कृषी विपननात सुधारणा, सिंचन सुधारणा आणि आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करणे.

२. उद्योग सेवा :–

या दोन्ही क्षेत्रासाठी व्यापक कार्य बिन्दुची निवड करून निर्यात संवर्धन आणि उच्च उत्पाकतेवर भर देणे.

३. शहरी विकास :—

जमिनीच्या किंमतीना कमी करून स्वस्त घराची व्यवस्था करणे या करिता भूमी संबंधी कायदे लवचिक बनविणे तथा शहरी जमीनीच्या मालकीत सुधारणा करणे.

४. ऊर्जा :—

वर्ष २०२२ पर्यंत सर्व घरामध्ये वीज उपलब्ध करून देणे. याशिवाय विज्ञान आणि तंत्रविज्ञान प्रशासन करप्रणाली शिक्षण आणि कौशल्य विकास, आरोग्य, पर्यावरण आणि जल संधारण सर्वसमावेशक समाजाच्या निर्माण करणे इत्यादी क्षेत्रावर भर दिल्याचे दिसून येते.

**संदर्भ ग्रंथ सुची :**

१. रमेश सिंन्ह— भारतीय अर्थव्यवस्था, Mcgraw Hill Education Pvt Ltd Chennai

२. डॉ. जी न. झामरे— भारतीय अर्थव्यवसथा, पिंपळपूरे प्रकाशन— महाल नागपूर

३. प्रतियोगिता हिंदी मासिक — जुलै २०१९